महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं.१५६०/१ आडगांव शिवार,
न्यु इंग्लिश स्कुलजवळ, मुंबई आग्रा रोड,
नाशिक– ४२२००३

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Nashik
Gat/Sr.No.1560/1 Adgaon shivar,
New English School, Mumbai-Agra Road,
Nashik - 422003

Website-sscboardnashik.com
Email-nsksec@rediffmail.com

क्र./नाविमं/उमा/अ–१/ ६८८
नाशिक–४२२००३
दिनांक:– २१/०७/२०२०

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मंडळ कार्यालयाच्या कार्यकक्षेतील
सर्व कनिष्ठ महाविदयालये,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदूरबार

**विषय :–प्रपत्र –क सादर करणेबाबत**

उपरोक्त विषयास अनुसरुन मंडळ कार्यालयाच्या कार्यकक्षेतील सर्व कनिष्ठ महाविदयालय प्रमुखांना कळविण्यात येते की, आपणास वेळोवेळी मंडळाकडून साहित्यांचे वाटप/स्विकृती करावे लागते त्यासाठी आपणास एस एम एस द्वारे आपल्या भ्रमणध्वनीवर संदेश पाठविण्यात येतो. परंतू असे निदर्शनास आले आहे की बहुतांश प्राचार्य/मुख्याध्यापक व लिपिक यांची बदली किंवा सेवानिवृत्तीमुळे ब–याच कनिष्ठ महाविदयालयांना एस एम एस पोहोच होत नसल्याने संबंधित कनिष्ठ महाविदयालयाचे प्रतिनिधी साहित्य घेण्यासाठी किंवा साहित्य स्विकारण्यासाठी निर्धारीत दिनांकास वाटप केंद्रावर उपस्थित राहत नाहीत.

तेव्हा आपणास या पत्राद्वारे सूचित करण्यात येते की, मागील पृष्ठावर देण्यात आलेले प्रपत्र–क मध्ये अद्ययावत बिनचूक माहिती भरुन मंडळ कार्यालयास **न चुकता शुक्रवार दि. १५/०८/२०२०** पर्यत पाठविण्याची व्यवस्था करावी म्हणजे मंडळाकडून वेळोवेळी एस एम एस द्वारे कळविलेल्या माहिती पासून आपले कनिष्ठ महाविदयालय वंचित राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**नाशिक विभागीय मंडळ हे नवीन इमारतीमध्ये स्थलांतर झाले असून नवीन कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे–महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, सर्वे न. १५६०/०१, आडगांव शिवार, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, समाज कल्याण वस्तीगृहाशेजारी, आडगांव, नाशिक– ४२२ ००३**

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२ ००३.

(कृपया मागे पहावे.)

# प्रपत्र—क

उच्च माध्यमिक (इ.१२वी) सांकेतिक क्रमांक—जे. ____________________

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव व पत्ता | |
| २ | कनिष्ठ महाविदयालयाचे नांव व पत्ता | |
| ३ | प्राचार्य/मुख्याध्यापकाचे नांव | |
| ४ | प्राचार्य/मुख्याध्यापकांचा मोबाईल क्रमांक | |
| ५ | क.म.विदयालयाचा दुरध्वनी क्रमांक | |
| ६ | क.म. विदयालयाची वेबसाईट | |
| ७ | क.म. विदयालयाचा ई—मेल आयडी | |
| ८ | मंडळाचे काम पाहणा—या लिपिकाचे नांव | |
| ९ | लिपिकाचा मोबाईल क्रमांक | |

वरीलप्रमाणे कनिष्ठ महाविदयालयाची दिलेली माहिती बिनचूक आहे याची मी हमी देतो.

प्राचार्य/मुख्याध्यापक स्वाक्षरी
क.म.विदयालयाचा शिक्का

माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं.१५६०/१ आडगांव शिवार,
न्यु इंग्लिश स्कुलजवळ, मुंबई आग्रा रोड,
नाशिक– ४२२००३

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Nashik
Gat/Sr.No.1560/1 Adgaon shivar,
New English School, Mumbai-Agra Road,
Nashik - 422003

Website-sscboardnashik.com
Email-nsksec@rediffmail.com

क्र./नाविमं/उमा/अ–१/६८१
नाशिक–४२२००३
दिनांक:–२१/०७/२०२०

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
---------------
---------------

विषय :–फेब्रु./मार्च–२०२० मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्यांच्या गुणपत्रिका व संपादणूक अहवाल पाठविणेबाबत...

फेब्रु./मार्च–२०२० मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या कनिष्ठ महाविदयालयातून प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्यांच्या एकूण––––––मुळ गुणपत्रिका व विदयार्थी संपादणूकीचा अहवाल (उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालय रजिस्टर) या पत्रासोबत पाठविण्यात येतआहे.

उपरोक्त साहित्य प्राप्त होताच सदर साहित्य शाळा/कनिष्ठ महाविदयालय रजिस्टरनुसार बरोबर आहे किंवा नाही याची खात्री करून पोहोच पावती या कार्यालयाकडे त्वरीत पाठवावी. सदर गुणपत्रिका संबंधित विदयार्थ्यांना देण्यात याव्यात एखादया विदयार्थ्याची गुणपत्रिका आपणास प्राप्त न झाल्यास मंडळ प्रतिनिधीकडे त्याचवेळी किंवा दुस–या दिवशी फॅक्सद्वारे/ई–मेलद्वारे किंवा हस्तपोच माहिती मंडळास कळविल्यासच दखल घेण्यात येईल. विलंबाने कळविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

जर गुणपत्रकातील नोंदीत काही तफावत/चुका/त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत आवश्यक कागदपत्रासह तसे या कार्यालयास तात्काळ निदर्शनास आणून मुळ गुणपत्रक दुरूस्तीसाठी कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. विदयार्थ्यांच्या नावातील दुरूस्ती असल्यास आपल्या उच्च माध्यमिक शाळेचे/कनिष्ठ महाविदयालयाचे जनरल रजिस्टर व त्याची छायाप्रत सांक्षाकिंत करून मंडळात समक्ष सादर करणे आवश्यक आहे. नाव दुरूस्तीबाबत उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयाचे लेखीपत्र व मंडळाच्या फॉर्म नं. १ वर मा. शिक्षण उपसंचालक, नाशिक याची स्वाक्षरी घेवून प्रत्येक दुरूस्तीसाठी शुल्क राष्ट्रीयकृत बॅकेच्या धनाकर्षाद्वारे/बॅक ऑफ इंडीयाच्या चलनाद्वारे/मंडळ कार्यालयात रोखीने सादर करावे. नाव दुरूस्ती प्रस्तावासोबत शाळा/कनिष्ठ महाविदयालय सोडल्याच्या दाखल्याची, जनरल रजिस्टर व त्याची सांक्षाकिंत छायाप्रत व इ.१०वी उत्तीर्णतेबाबतचे गुणपत्रक/प्रमाणपत्रांची छायाकिंत प्रत जोडणे आवश्यक आहे.

ज्या विदयार्थ्यांना मंडळाने गैरमार्ग प्रकरणी शिक्षा दिली आहे, त्याबाबतची नोंद मंडळाने वितरीत केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालय रजिस्टरमध्ये आहे.तसेच गैरमार्गाबाबत स्वतंत्र अधिसूचना (डिबार्ड यादी) मध्येही आहे. त्याप्रमाणे संबंधित विदयार्थ्यांना आपण आपल्या स्तरावरून लेखी कळवावे.

सदर गुणपत्रिकांचे वाटप विदयार्थ्यांना करण्यापूर्वी गुणपत्रिका आपल्याच उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयातील विदयार्थ्यांचीच असल्याची प्रथम खात्री करावी. तसेच गुणपत्रिकेवरील विदयार्थ्यांचे नाव, विषय, माध्यम, मा.विभागीय सचिवांची स्वाक्षरी, मंडळाचा लोगो, गुणपत्रिका लॅमिनेशन बरोबर असल्याची खात्री करूनच संबंधित विदयार्थ्यांना दयावी. तसेच नसल्यास ती गुणपत्रिका मंडळाकडे तात्काळ परत पाठवावी किंवा मंडळ कार्यालयाशी संपर्क साधावा.

**निकालानंतरच्या दुरूस्तीबाबतच्या शुल्काचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.क्र | दुरूस्तीचा तपशील | दुरूस्ती शुल्क |
|---|---|---|
| १ | श्रेणी/प्रात्य./मौखीक/अंतर्गत मुल्यमापन इ. गुण/श्रेणी निकालानंतर सादर करणे | रू.५०/– प्रतिदिन |
| २ | विषय सूट, श्रेणी दुरूस्ती, विषय बदल, प्रात्यक्षिक गुण/मौखीक गुण अंतर्गत मुल्यमापनाचे गुण यामधील कोणत्याही एका तरतुदीच्या कार्यवाहीसाठी | रु. १०००/– (शाळा/क.म. विदयालयास दंड) |
| ३ | गुणपत्रिकातील प्रत्येक दुरूस्तीसाठी | रू. ५०/–प्रति चूक |
| ४ | गुणपत्रक/प्रमाणपत्र नवीन देणे | रू. १००/– |
| ५ | लॅमिनेशन | रू. १०/– |

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ नाशिक ४२२ ००३.

टीप–नाशिक विभागीय मंडळ हे नवीन इमारतीमध्ये स्थलांतर झाले असून नवीन कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे–महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,नाशिक विभागीय मंडळ सर्वे न. १५६०/०१, आडगांव शिवार, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, समाज कल्याण वस्तीगृहाशेजारी, आडगांव, नाशिक– ४२२ ००३

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं.१५६०/१ आडगांव शिवार,
न्यु इंग्लिश स्कुलजवळ, मुंबई आग्रा रोड,
नाशिक– ४२२००३

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Nashik
Gat/Sr.No.1560/1 Adgaon shivar,
New English School, Mumbai-Agra Road,
Nashik - 422003

Website-sscboardnashik.com
Email-nsksec@rediffmail.com

क्र./नाविमं/उमा/अ–१/ ६९०
नाशिक–४२२००३
दिनांक:– २१/०७/२०२०

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
______________________
______________________

विषय :–फेब्रु./मार्च–२०२० मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्यांचा विकल्प फॉर्मबाबत...
संदर्भ :–राज्य मंडळ कार्यालयाचे क.रा.मं./परीक्षा–८/३६५०/दि.१५/५/२०१३ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, फेब्रु./मार्च–२०२० मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या कनिष्ठ महाविदयालयातील गुणसुधार/श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ठ झालेल्या विदयार्थ्यांच्या गुणपत्रिका मंडळाकडे उपलब्ध आहे.

गुण/श्रेणीसुधार योजनेअंतर्गत निकाल जाहीर झाल्यानंतर विदयार्थ्यांना या योजनेखाली प्रविष्ठ झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका स्विकारणे अथवा नाकारणेबाबत विकल्प देण्याचा अधिकार आहे. सदर विकल्पाचा नमुना या पत्रासोबत आपणास पाठविण्यात येत आहे.
गुण/श्रेणीसुधार योजनेअंतर्गत उत्तीर्णतेची गुणपत्रिका स्विकारणेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१. सुधारीत गुणपत्रिका बदलून घेणेसाठी ऑनलाईन निकाल जाहीर झाल्यानंतर एक महिन्यात त्वरीत विकल्प देणे अनिवार्य राहील.
२. गुणपत्रिका वितरीत केल्याच्या दिनांकापासून एक महिन्यापर्यंत विकल्प दिल्यास सुधारीत गुणपत्रिका विनामूल्य देण्यात येईल.
३. विकल्प देण्यास विलंब झाल्यास तद्नंतरच्या एक महिन्याकरीता रू.१००/– शुल्क आकारून सुधारीत गुणपत्रिका देण्यात येईल.
४. गुणपत्रिका वितरीत केल्यानंतर दोन महिन्यापासून ते सहा महिने कालावधी शुल्क रू.२००/– आकारून सुधारीत गुणपत्रिका देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

उपरोक्त १ ते ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विदयार्थ्याकडून विकल्प भरून घेण्याची व तो विकल्प मंडळाकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी, विदयार्थ्याने वरील मुदतीत विकल्प न दिल्यास त्यांना पूर्वीची गुणपत्रिका स्विकारावयाची आहे, असे गृहित धरण्यात येवून पुढील कार्यवाही मंडळाकडून करण्यात येईल. विदयार्थ्यास गुण/श्रेणीसुधार योजनेअंतर्गत फेब्रुवारी/मार्च –२०२० परीक्षेचे गुणपत्रक पाहिजे असल्यास त्याचे या पूर्वीच्या परीक्षेचे मुळ गुणपत्रक विकल्प फॉर्म सोबत आपल्या पत्रासह मंडळाकडे जमा करावे. त्यानंतरच त्यास सुधारीत मुळ गुणपत्रिका देण्यात येईल. तसेच विदयार्थ्यास या पूर्वीच्या परीक्षेची गुणपत्रिका (संपादणूक) मान्य असल्यास त्यानुसार विकल्प आपल्या पत्रासह मंडळाकडे जमा करावा.

विदयार्थ्याने विकल्प दिल्यानंतर त्यानुसार सदर विदयार्थ्याची नाकारण्यात आलेल्या या पूर्वीच्या परीक्षेची संपादणूक आपणास पाठविण्यात आलेल्या शालेय अभिलेख (S.R.)/कनिष्ठ महाविदयालय (C.R.) मध्ये रद्द करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मंडळास सादर करावा. तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत परीक्षा देणा–या विदयार्थ्यासंदर्भात विकल्पाबाबत पाठपुरावा व मार्गदर्शन घेणेची जबाबदारी संबंधित शाळा/कनिष्ठ महाविदयालयाची राहील.

सोबत– विकल्प फॉर्म नमुना

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ नाशिक ४२२ ००३.

टीप– नाशिक विभागीय मंडळ हे नवीन इमारतीमध्ये स्थलांतर झाले असून नवीन कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे–महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, सर्वे न. १५६०/०१, आडगांव शिवार, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, समाज कल्याण वस्तीगृहाशेजारी, आडगांव, नाशिक– ४२२ ००३

# गुणसुधार/श्रेणीसुधार योजना— विकल्प फॉर्म

मी————————————————————फेब्रुवारी/मार्च—२०२० च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस गुणसुधार/श्रेणीसुधार योजनेअंतर्गत ——————————————————————————या कनिष्ठ महाविदयालयामार्फत प्रविष्ठ होवून उत्तीर्ण झालो/झाली आहे. माझी नवीन संपादणूक खालीलप्रमाणे

बैठक क्रमांक — एस ..........................

| अ.क्र. | विषयाचे नांव | संपादित केलेले गुण/श्रेणी |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |
| ७ | **पर्यावरण शिक्षण** | |
| ८ | **आरोग्य व शारीरिक शिक्षण** | |

एकूण गुण .......................... टक्केवारी ..........................

---

मी यापूर्वी फेब्रुवारी/मार्च—२०१९/जुलै २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस ——————————————————————————या कनिष्ठ महाविदयालयामार्फत प्रविष्ठ होवून उत्तीर्ण झालो आहे. त्यामधील संपादणूक खालीलप्रमाणे आहे.

बैठक क्रमांक — एस ..........................

| अ.क्र. | विषयाचे नांव | संपादित केलेले गुण/श्रेणी |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |
| ७ | **पर्यावरण शिक्षण** | |
| ८ | **आरोग्य व शारीरिक शिक्षण** | |

एकूण गुण .......................... टक्केवारी ..........................

वरील दोन्ही परीक्षांचा तुलनात्मक विचार करता मी ———————————————— असे लिहून देतो की, फेब्रुवारी/मार्च — २०१९, जुलै — २०१९ व फेब्रुवारी/मार्च — २०२० च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस एकूण गुण व गुणांची टक्केवारी अधिक असल्याने त्या परीक्षेचा निकाल स्वखुशीने स्विकारण्यास तयार आहे.

तसेच फेब्रुवारी/मार्च—२०१९ व जुलै २०१९ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेचे एकूण गुण व गुणांची टक्केवारी कमी असल्याने त्या परीक्षांची संपादणूक रद्द करण्यास माझी संमती आहे.

विदयार्थ्याचे नांव —

स्वाक्षरी—

प्राचार्यांचा स्वाक्षरी व शिक्का
क.म.विदयालय सांकेतिक क्रमांक
जे—

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षणमंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक
गट/सर्व्हे नं.१५६०/१ आडगांव शिवार,
न्यु इंग्लिश स्कुलजवळ, मुंबई आग्रा रोड,
नाशिक— ४२२००३

Maharashtra State
Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board, Nashik
Gat/Sr.No.1560/1 Adgaon shivar,
New English School, Mumbai-Agra Road,
Nashik - 422003

Website-sscboardnashik.com

Email-nsksec@rediffmail.com

क्र./नाविमं/उमा/अ—१/६९
नाशिक—४२२००३
दिनांक:— २१/०७/२०२०

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मंडळ कार्यालयाच्या कार्यकक्षेतील
सर्व कनिष्ठ महाविदयालये,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदूरबार

**विषय :—फेब्रु./मार्च—२०२१ मध्ये घेण्यात येणा—या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेतील दिव्यांग विदयार्थ्यांना अनुज्ञेय सवलतीबाबत...**

**संदर्भ :—१.दिव्यांग विदयार्थ्यांच्या सोयी/सवलतीसंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा दि. ८/१/२०१६ रोजीचा शासन निर्णय.**

**२. दिव्यांग विदयार्थ्यांना लेखनिक मिळणेसंदर्भात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा दि. १५/२/२०१६ रोजीचा शासन निर्णय.**

**३. दि. १६/१०/२०१८ रोजीचा शासन निर्णय.**

नाशिक विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील मंडळ मान्यताप्राप्त सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालय प्रमुखांना कळविण्यात येते की, मंडळामार्फत घेण्यात येणा—या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा—या दिव्यांग विदयार्थ्यांना मंडळामार्फत शासन आदेशानुसार सवलती देण्यात येतात. तसेच संदर्भिय शासन निर्णयांचे अवलोकन करावे.

संबंधित विदयार्थ्यांना अशा सवलती मिळविण्यासाठी विदयार्थ्यांची वैदयकिय प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सध्या सदर विदयार्थ्यांची वैदयकिय प्रमाणपत्रे मुख्याध्यापक/प्राचार्य पातळीवर छाननी न करताच मंडळाकडे पाठविली जातात. त्यामुळे त्या संदर्भात वारंवार पत्रव्यवहार करावा लागतो व ही प्रमाणपत्रे विलंबाने सादर केली जातात, परिणामी असे विदयार्थी देय सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दिव्यांग विदयार्थी अनुज्ञेय सवलतीपासून वंचित राहू नये त्या अनुषंगाने सन २०२०—२१ या शैक्षणिक वर्षापासून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. उपरोक्त फेब्रुवारी/मार्च—२०२१ परीक्षेस प्रविष्ठ होणा—या दिव्यांग विदयार्थ्यांची वैदयकिय प्रमाणपत्राची छायांकित प्रत प्रमाणित करून प्रस्तुत शैक्षणिक वर्षात सप्टेंबर अखेर पर्यंत सादर करावीत.
२. विदयार्थ्यांच्या वैदयकिय प्रमाणपत्रावरील संपूर्ण नाव व जनरल रजिस्टर मधील नाव सारखेच आहे याची खात्री करावी त्यामध्ये तफावत असता कामा नये. नावात तफावत असल्यास रू. १००/— च्या स्टॅम्प पेपरवर विदयार्थ्यांचे/पालकांचे प्रतिज्ञापत्र वैदयकिय प्रमाणपत्रासोबत मंडळास सादर करावे किंवा जनरल रजिस्टर मधील नावाप्रमाणे वैदयकिय प्रमाणपत्र मंडळास सादर करावे. मुळ वैदयकिय प्रमाणपत्राची व दिव्यांगत्वाची खात्री करूनच प्रस्ताव सप्टेंबर अखेर पर्यंत सादर करावेत. मुदतीनंतर प्रस्ताव प्राप्त झाल्यास दंडात्मक शुल्क आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.
३. वैदयकिय प्रमाणपत्रामध्ये दिव्यांगत्वाची टक्केवारीची नोंद असणे आवश्यक आहे. वैदयकिय प्रमाणपत्रे विहित नमुन्यात असणे आवश्यक आहे. दिंव्यागत्वाची खात्री करण्यासाठी त्याच शैक्षणिक वर्षातील फोटो वैदयकिय प्रमाणपत्रावर चिकटवून मुख्याध्यापक/प्राचार्यांनी सांक्षाकिंत करणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी. सदरच्या सूचना फलकावर लावून विदयार्थ्यांच्या नजरेस ठळकपणे आणाव्यात.
४. दिव्यांग विदयार्थ्यास जिल्हा शल्य चिकित्सकामार्फत प्राप्त झालेल्या वैदयकिय प्रमाणपत्रावर नमूद केलेल्या दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार खालीलप्रमाणे दिव्यांगत्वाचा प्रकार व सांकेतांक क्रमांक सोबत दिलेल्या तक्त्यात नमूद करावा. तसेच दिव्यांगत्वाचा प्रकार व सांकेतांक क्रमांक विदयार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना देखील न चुकता नमूद करावा.

(कृपया मागे पहावे.)

| अ. क्र. | दिव्यांगाचा प्रकार | दिव्यांगाचा सांकेतांक | अ.क्र. | दिव्यांगाचा प्रकार | दिव्यांगाचा सांकेतांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंशत:/पुर्णत: अंध (Blindness/Partial Blind) | १ | १२ | मज्जासंस्थेचे तीव्र आजार (Chronic Neurological Conditions) | १२ |
| २ | कुष्ठरोगातून बरे झालेले निवारित (Leprosy Cured Persons) | २ | १३ | अध्ययन अक्षम (Specific Disabilities) | १३ |
| ३ | कर्णबधीर (Deaf and Dumb) | ३ | १४ | गतीमंद (Slow Learner/Intellectual Disabllity Border Line) | १४ |
| ४ | अस्थिव्यंग (Locomotor Disability including Orthopedic Disability) | ४ | १५ | मल्टीपल स्क्लेरोसिस (Multiple Sclerosis) | १५ |
| ५ | शारीरिक वाढ खुंटणे (Dwarfism) | ५ | १६ | वाचा व भाषा अक्षमत्व (Speech and Language Disabllity) | १६ |
| ६ | बौध्दिक अक्षम(मतिमंद) (Intellectual Disabllity-Mentally challenged) | ६ | १७ | थॅलस्सेमिया (Thalassemia/Cancer) | १७ |
| ७ | बहुविकलांग (Multipli Disabilities) | ७ | १८ | हिमोफिलिया (Hemophilia) | १८ |
| ८ | मानसिक आजार (Mental Illness) | ८ | १९ | सिकल सेल (Sickle Cell Disease) | १९ |
| ९ | ऑटिस्टिक (स्वमग्न) (Autism Spectrum Disord) | ९ | २० | ॲसिड ॲटॅक व्हिक्टिम (Acid Attack Victim) | २० |
| १० | सेरेबल पाल्सी (Cerebral Palsy) | १० | २१ | पार्किनसन्स (Parkinoson Disease) | २१ |
| ११ | स्नायूंची विकृती (Muscular Dystrophy) | ११ | २२ | इतर आजारामुळे शालेय शिक्षणात अडचणी येणा-या विदयार्थ्यांबाबत (Other Disabilities)<br>I) एपिडरमोलिसिस बुलोसा (Epidermolysis Bullosa)<br>II) HIV बाधित<br>III) Diabetes mellitus type,<br>IV) Pediatric cancer survivors<br>V) Cancer afficted children on maintainance therapy<br>VI) Children with epilepsy<br>VII) Children with ADHD<br>VIII) Children with neurological Wilson disease | २२ |

उपरोक्त पध्दतीनुसार विदयार्थ्यांची वैदयकिय प्रमाणपत्रे सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये नमूद करून मंडळ कार्यालयाकडे दि.१४ ऑगस्टपर्यंत पाठविण्यात यावी असे कळविण्यात येवून सुध्दा काही उच्च माध्यमिक शाळांनी/कनिष्ठ महाविदयालयांनी फेब्रुवारी/मार्च २०२० च्या परीक्षेत याप्रमाणे कार्यवाही न करता विलंबाने प्रस्ताव सादर केले होते. परिणामी त्यामुळे काही विदयार्थी सवलतीपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. तरी याबाबत मुख्याध्यापक/प्राचार्यांना पुनश्च कळविण्यात येते की, दिव्यांग विदयार्थ्यांचे प्रस्ताव या वर्षी सप्टेंबर अखेरपर्यंतच स्विकारले जातील. सन २०२०—२१ या शैक्षणिक वर्षातील प्रस्ताव विहित मुदतीनंतर स्विकारले जाणार नाहीत. विलंबाने प्राप्त झालेले दिव्यांग विदयार्थ्यांचे प्रस्ताव नाकारण्याच्या मंडळाच्या निर्णयामुळे संबंधित विदयार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य म्हणून आपली राहील, याची नोंद घ्यावी.

दिव्यांग विदयार्थ्यांना लेखनिक सवलतीचे विहित नमुन्यातील प्रपत्र या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेले आहे.

(नितीन उपासनी)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ नाशिक ४२२ ००३.

**टीप— नाशिक विभागीय मंडळ हे नवीन इमारतीमध्ये स्थलांतर झाले असून नवीन कार्यालयाचा पत्ता पुढीलप्रमाणे—महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, सर्वे न. १५६०/०१, आडगांव शिवार, न्यू इंग्लिश स्कूलजवळ, समाज कल्याण वस्तीगृहाशेजारी, आडगांव, नाशिक— ४२२ ००३.**

# दिव्यांग विदयार्थ्यांबाबत मुख्याध्यापक/प्राचार्यांनी दयावयाचे प्रमाणपत्र

**कनिष्ठ महाविदयालयाचा सांकेतिक कमांक जे –**

प्रमाणित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळातर्फे घेण्यात येणा–या फेब्रु/मार्च/जुलै–२०––––– च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस खालील विदयार्थी माझ्या कनिष्ठ महाविदयालयातून नियमित/पुर्नपरीक्षार्थी विदयार्थी म्हणून प्रविष्ठ होंत आहे/आहेत.

१. विदयार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रावरील नाव व दिव्यांग प्रमाणपत्रावरील नाव सारखेच असून सदर दस्ताऐवजाची पडताळणी शालेय अभिलेखावरून करण्यात आलेली आहे.

२. विदयार्थ्याच्या दिव्यांग प्रमाणपत्रावरील दिव्यांगात्वाची टक्केवारी २५ टक्के व त्याहून अधिक आहे याची मी खात्री केली आहे.

३. विदयार्थ्याचा चालू शैक्षणिक वर्षातील फोटो वैदयकिय प्रमाणपत्रावर लावून प्रमाणित केलेला आहे.

४. अंध,मूकबधीर, शारिरीक दृष्टया दुर्बल, बहुविकलांग,अध्ययन अक्षम व ऑटिझमग्रस्त विदयार्थ्यांच्या सोबतच्या दिव्यांग प्रमाणपत्र नमुन्याच्या मागील पृष्ठावरील विषय योजनेचे मी वाचन केले असून त्यानुसार विषय घेणेबाबत संबंधित विदयार्थ्यास मार्गदर्शन केले आहे. तसेच मंडळामार्फत मुद्रित करण्यात आलेले, विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यासाठी सवलती, विशेष योजना, परीक्षा योजना इ. बाबींचे विदयार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

५. दिव्यांग विदयार्थ्यास लेखनिक मंजूरीस्तव खालीलप्रमाणे दस्तऐवज आवश्यक आहेत याची मला जाणीव आहे.

   १. लेखनिक मिळणेसाठी दिव्यांग विदयार्थी अर्ज, लेखनिक विदयार्थ्याचा अर्ज/संमतीपत्र, लेखनिक विदयार्थ्याच्या पालकांची संमतीपत्र व मुख्याध्यापक/प्राचार्यांचे संमती/शिफारस पत्र प्रतिस्वाक्षरी करुन मंडळाकडे विहित मुदतीत पाठविणे बंधनकारक आहे.

   २. ज्या दिव्यांग विदयार्थ्यासाठी लेखनिक प्रस्तावित केलेला आहे अशा दोन्ही विदयार्थ्यांचे फोटो शाळेच्या लेटरहेडवर लावून प्रमाणित करणे आवश्यक आहे.

   ३. लेखनिकाची सुविधा फक्त अंध, हाताने दिव्यांग, बहुविकलांग, अध्ययन अक्षम व ऑटिझमग्रस्त विदयार्थ्यासाठीच आहे.

   ४. मूकबधीर विदयार्थ्यासाठी लेखनिक सुविधा नाही.

   ५. ज्या दिव्यांग विदयार्थ्यास लेखनिकाची आवश्यकता असेल अशा विदयार्थ्यांना इ. ११ वीत शिकत असलेला विदयार्थी लेखनिक म्हणून घ्यावा.

दिनांक –
ठिकाण–

**मुख्याध्यापक/प्राचार्यांची स्वाक्षरी**
**कनिष्ठ महाविदयालयाचा शिक्का**

| अ. क्र. | दिव्यांग विदयार्थ्यांचे नांव | दिव्यांगाचा प्रकार | दिव्यांग टक्केवारी | दिव्यांग कोड |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक — ४२२ ००३

उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविदयालय सांकेतिक क्रमांक — जे—

## दिव्यांग विदयार्थ्यांची माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जनरल रजिस्टर मधील अनुक्रमांक | दिव्यांग विदयार्थ्यांचे नांव | दिव्यांग विदयार्थ्यांने घेतलेले विषय, विषय कोड व माध्यम | | | दिव्यांगाचा प्रकार | | | वैदयकिय प्रमाणपत्रात कोणतीही त्रुटी नाही | दिव्यांग विदयार्थ्यांचा फोटो |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विषय | विषय कोड | माध्यम | प्रकार | कोड क्रमांक | टक्केवारी | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

मुख्याध्यापक/प्राचार्यांची स्वाक्षरी
क.म.विदयालय शिक्का

# दिव्यांग विद्यार्थ्याचा अर्ज

विद्यार्थ्याचा
सध्याचा फोटो

दिनांकः-

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य

---------------------------

---------------------------

विषयः- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च/जुलै-ऑगस्ट-२० परीक्षेकरीता लेखनिक मिळणेबाबत...

वरील विषयास अनुसरून विनंती अर्ज करीतो की, मी ------------------------------------ इ.१२ वी तुकडी -------- मध्ये आपल्या कनिष्ठ महाविदयालयामध्ये शिक्षण घेत आहे. मी दिव्यांग असल्यामुळे मला उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च/ जुलै-ऑगस्ट-२० साठी लेखनिकाची आवश्यकता आहे.

लेखनिक विदयार्थी/विदयार्थीनीचे नांव --------------------------इयत्ता------तुकडी---------

मध्ये------------------------------------------ या कनिष्ठ महाविदयालयामध्ये शिक्षण घेत असून सदर विदयार्थी मला लेखनिक म्हणून घेण्यास परवानगी मिळावी ही विनंती.

दिनांक -

ठिकाण -

**विद्यार्थ्याची/विद्यार्थीनीची स्वाक्षरी**

-------------------------------------------------------------------------------

# मुख्याध्यापक/प्राचार्यांचे शिफारसपत्र

प्रमाणित करण्यात येते की, सदर विद्यार्थी/विद्यार्थीनी नांव ———————————————या कनिष्ठ महाविद्यालयातील असून सन :————— या शैक्षणिक वर्षात इयत्ता :—————— तुकडी:—————या वर्गात शिक्षण घेत असून त्यास वरील लेखनिक नाव ——————————————————————घेण्याबाबतची शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक —

ठिकाण —

**मुख्याध्यापकांची स्वाक्षरी**
**व कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का**

## लेखनिक विदयार्थ्यांचे संमतीपत्र

लेखनिकाचा सध्याचा फोटो

मी लेखनिक नांव कुमार/कुमारी :— ——————————————————————————
कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव :— ——————————————————————————
————————————————————या कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी/विदयार्थीनी असून सन :— ——————————या शैक्षणिक वर्षात इयत्ता :— ———————— तुकडी :———————— या वर्गात शिकत आहे.

मी परिक्षार्थी नांव :—————————————————————————— इयत्ता :—————————— तुकडी :——————— या वर्गात शिकत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च/जुलै—२० ——————— परीक्षेकरीता लेखनिक म्हणून काम करण्यास माझी संमती आहे, असे लिहून देतो.

दिनांक —
ठिकाण —

लेखनिक विद्यार्थी/विद्यार्थ्यानीची स्वाक्षरी

---

## लेखनिकाच्या पालकांचे संमतीपत्र

मी श्री/श्रीमती :-----------------------------------------------------------माझा पाल्य कुमार/कुमारी--------------------इयत्ता :-------- तुकडी :---------- या वर्गात--------------
--------------------------------------या कनिष्ठ महाविदयालयामध्ये शिक्षण घेत आहे.

--------------------------------------------------------------------या कनिष्ठ महाविद्यालयातील कुमार/कुमारी--------------------------------------------- इयत्ता :-------तुकडी :---------- या वर्गात शिकत असलेल्या दिव्यांग विदयार्थी/विदयार्थीनीस उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च/ जुलै-२० ------ परीक्षेकरीता माझ्या पाल्यास लेखनिक म्हणून देण्यास मी संमती देत आहे.

दिनांक -
ठिकाण-

लेखनिकाच्या पालकांची स्वाक्षरी

---

## मुख्याध्यापक/प्राचार्यांचे शिफारस पत्र

प्रमाणित करण्यात येते की, सदर लेखनिक विद्यार्थी/विद्यार्थीनी नांव ----------------------------- हा/ही---------------------------------------------------------------------------या कनिष्ठ महाविदयालयातील विदयार्थी/विदयार्थीनी असून सन :- ---------- या शैक्षणिक वर्षात इयत्ता :-------- तुकडी :------ या वर्गात शिकत आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे माझ्या कनिष्ठ महाविदयालयातील विदयार्थी/विदयार्थीनी नांव ---------- ------------------------- यास लेखनिक म्हणून देण्यास माझी संमती/शिफारस आहे.

दिनांक -
ठिकाण-

मुख्याध्यापक/प्राचार्यांची स्वाक्षरी
व कनिष्ठ महाविदयालयाचा शिक्का